International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# भक्ती चळवळ आणि मानवतेचा आत्मा

**प्रा. सुनील लक्ष्मण परदेशी**
*महात्मा फुले कला,विज्ञान व वाणिज्य, महाविद्यालय ,पनवेल, जि. रायगड*
*Corresponding Author – प्रा. सुनील लक्ष्मण परदेशी*

DOI - 10.5281/zenodo.18654168

**गोषवारा:**

*भक्ती चळवळीने धार्मिक प्रथेपेक्षा प्रेम,समानता आणि भक्तीचे मूल्यांना प्रोत्साहन देऊन भारताला आध्यात्मिक परिवर्तन घडून आणले.भक्ती चळवळ ही वेगवेगळ्या प्रदेशांत वेगवेगळी होती .दक्षिण भारतात अलवार ,नयनार यांनी विष्णू व शिव यांच्या भक्तीवर लक्ष केंदित केले. उत्तर भारतात तुलसीदास ,सूरदास यांनी तर स्थानिक भाषा ,कविता ,गाणी इ.योगदान दिले आहे.या चळवळीने एकाच देवावरील श्रद्धेवर भर दिला त्यांमुळे देवाशी वैयक्तिक संबंध निर्माण झाले .खरी भक्ती ही जन्म आणि मृत्युच्या चक्रातून मुक्ती मिळू शकते.वैदिक धर्माला व्यापक व उदार स्वरूप देऊन सर्व वर्णाच्या ,जातीच्या, स्त्री-पुरुषांना समानतेच्या पातळीवर आणणारा भक्तियोग शिकवला हे भागवत धर्माचे मुख्य कार्य होते.*

**प्रस्तावना**:

भक्ती चळवळ ही धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळ होती ती सातव्या शतकापासून सुरू झाली. या चळवळीने जातीय व्यवस्थेला व सामाजिक समतेचा आव्हान दिले. या चळवळीमध्ये असणा-या व्यक्तींना व संतांनी भारतीय समाज व संस्कृतीमध्ये परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या शिकवणीमुळे व्यक्तींना देवाशी जोडण्याची प्रेरणा मिळाली.

हिंदू धर्मामध्ये भक्तीला अनन्यसाधारण महत्व आहे. भक्ती ही निर्गुण, निराकार अशा परमेश्वरापासून ते सगुण व साकार अशा परमेश्वरापर्यंत करण्याची पद्धत आहे. भक्तीची सुरुवात वेदकालापासून झाली व तिचा विकास भागवता मध्ये झाला. भक्ती पंथ हा प्रामुख्याने विष्णू व शिव या दोन देवाभोवती केंद्रित झालेला आहे इतर देवता नंतर त्यामध्ये सामील करून घेण्यात आले[१]. भक्ती हाच सर्व भक्ती पंथाचा पाया आहे. ईश्वर भक्तीमुळे भक्ताला कोणाची भीती नसते ,अगर पर्वा नसते. खरी भक्ती निरपेक्ष असते. भक्तीच्या माध्यमातून ईश्वर भक्तावर प्रेम वर्षाव करतो त्यातच भक्त रममाण होतो. त्यांच्याशी एकरूप होतो[२].

**१. सुफी व इस्लाम धर्माचा प्रभाव:**

भक्ती चळवळीवर प्रामुख्याने सुफी व इस्लाम धर्म यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात होता. त्यामध्ये देवावर भक्ती आणि प्रत्येक व्यक्तीचे वैयक्तिक देवाच्या भक्तीचा संदेश पसरण्यामध्ये महत्त्वाची भूमिका होती. हिंदू व मुस्लिम यांच्यामधील दरी कमी होण्यास मदत झाली.

**२. प्रादेशिक बदल:**

भक्ती चळवळ वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळी होती. दक्षिण भारतात अलवार,नयणार यांनी विष्णू व शिव यांच्या भक्तीवर लक्ष केंद्रित केले तर उत्तर भारतातील तुलसीदास आणि सूरदास यांनी स्थानिक भाषा व कविता गाणी या चळवळीत योगदान दिले. भक्ती चळवळ ही एक शक्तिशाली शक्ती होती ज्यामध्ये कठोर सामाजिक रचनेत प्रेम, समानता आणि भक्तीचा प्रसार करून समाजात परिवर्तन घडवून आणले.

**३. भक्ती चळवळीचे तत्त्वज्ञान:**

एकेश्वर वाद या मुळे चळवळीने एकाच देवावरील श्रद्धेवर भर दिला. त्यामुळे देवाशी वैयक्तिक संबंध निर्माण झाले. भक्ती ही जन्म आणि मृत्यू च्या चक्रामधून मुक्ती मिळू शकते. कर्मकांड व मूर्ती पूजेवर टीका. व्यक्ती ज्या भावनेच्या योगाने ईश्वराला सर्वार्थाने शरण जातो ती भावना म्हणजे भक्ती होय. भक्ती मार्गाने श्रद्धेला व मानवतेला अधिक महत्त्व असल्याने कर्मकांडाचे स्थान गौण आहे. भक्ती मार्गावर कर्मकांडाविरुद्ध एक प्रकारची बंडखोरी आढळून येते[३]. भक्ती या शब्दाचा भजू म्हणजे सेवा करणे या संस्कृत धातूपासून बनलेला आहे. भावार्थ किंवा भागवत धर्म प्रचाराची ही चळवळ तमिळ प्रदेशातून प्रथम आंध्र कर्नाटक व पुढे महाराष्ट्र त्यानंतर उत्तर प्रांतामध्ये अशी देशभर पसरली. परमेश्वर प्राप्तीसाठी भक्ती शिवाय दुस-या कशाचीही आवश्यकता  नाही. त्यामुळे कुल,जाती, वर्ण ,विषमतेला, स्त्री-पुरुष भेदाला किंवा विद्या,धन,प्रतिष्ठा इत्यादीमुळे प्राप्त होणा-या अधिकार भेदाला भागवत धर्मामध्ये बिलकुल आसरा नाही. भागवत धर्माने प्रत्येक प्रांतात विलक्षण लोकप्रियता मिळवली. तामिळ प्रांतामध्ये नयनाणार (शैव) अलवार(वैष्णव) दास कबीरांच्या भक्ती मार्गाने कर्नाटक मध्ये प्रसार केला[४]. अलवार याचा अर्थ देवात बुडालेला असा होतो. वैष्णव संत कवी होते ते एका ठिकाणावरून दुस-या ठिकाणी प्रवास करत असताना विष्णूची स्तुती करत असत. शैव नयनार हे भक्त कवी संत होते. नयनार कवींनी ,संतांनी शिवावरील स्तोतांचे संकलन केले 'तिरूमुराई' हे शैवधर्मातील ग्रंथ म्हणून विकसित झाला. कवींच्या प्रवासामुळे मंदिर व तीर्थक्षेत्र निर्माण झाली आणि सेवाभोवती अध्यात्मिक कल्पना पसरली.

**वारकरी संप्रदाय:**

महाराष्ट्रातील भक्ती चळवळ ही भक्ती साधेपणा आणि समतेच्या आधारावर होती. सामाजिक,राजकीय परिस्थिती आणि जात, लिंग आधारित असमान त्याला प्रतिसाद म्हणून ती उदयास आली. तेराव्या शतकात महाराष्ट्रात भक्ती चळवळ भरभराटीला आली. वारकरी संप्रदाय हा भक्तीप्रधान आहे ज्ञानेश्वर हे त्याचा पाया व तुकाराम हा त्यांचा कळस होय. पंढरपूरचा पांडुरंग वारक-यांचे आराध्य दैवत आहे. पांडुरंग म्हणजे सच्चिदानंद ,श्यामसुंदर श्रीकृष्ण होय. तोच विठ्ठल रूपाने पंढरपुरी युगे अठ्ठावीस विटेवर उभा राहिला आहे.त्याचे नेतृत्व संत व कवींनी केले. त्यांनी स्थानिक भाषा (मराठी) वापर करून अध्यात्मिक विचार उपलब्ध करून दिले. या चळवळीने धार्मिक, सामाजिक सुधारणा घडवून आणल्याणे लिंगभेद कमी झाला.रुढीवाद याला विरोध केला अशा प्रकारे महाराष्ट्रातील भक्ती चळवळीने राज्याची संस्कृती व साहित्य आणि सामाजिक ओळख निर्माण केली.

**महाराष्ट्रातील भक्ती चळवळीचे महत्त्व:**

१. या चळवळीने सामाजिक भावनेला  चालना दिली आणि जातीभेद नाकारला
२. त्यांनी अभंग,ओव्या आणि अध्यात्मिक कार्याने मराठी साहित्य समृद्ध केले.
३. वारकरी तीर्थयात्रेच्या परंपरेद्वारे त्यांनी सांस्कृतिक मजबूत केली.
४. या चळवळीने महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळीला प्रेरणा दिली.
५. भक्ती चळवळीने छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा चळवळीला प्रेरणा  दिली.

**महिलांचे सक्षमीकरण:**

भक्ती चळवळीत या काळात महिलांना लक्षणीय महत्त्व प्राप्त झाले. संतांनी समाजातील त्यांची भूमिका ओळखली आणि प्रोत्साहन दिले.

१. धार्मिक कार्यात महिलांचा सहभाग
२. आध्यात्मिक बाबींमध्ये महिलांना महत्त्व प्राप्त झाले .
३. महिलांच्या हक्काबद्दल आणि शिक्षणाबद्दल सामाजिक दृष्टिकोन बदलला.

वैदिक धर्माला व्यापक व उदार स्वरूप देऊन सर्व वर्गाच्या जातीच्या स्त्री- पुरुषांना समतेच्या पातळीवर आणणारा गीता भागवत प्रणित भक्तीयोग शिकवले हे भागवत धर्माचे मुख्य कर्म होते या कार्यासाठी प्रथम महानुभव व नंतर वारकरी हा संप्रदाय पुढे आला.

**भक्ती चळवळीचे महत्व.**

**१. राजकीय परिणाम:** राजकीय एकता निर्माण झाली.

**२. सामाजिक परिणाम:**

अ. जातीभेद व अस्पृश्यता कमी झाली.
ब. समता व बंधुता वाढली.
क. बहुजन समाजात विचार जागृती निर्माण झाली .
ड. ब्राह्मण पंडितांची मक्तेदारी कमी झाली
इ. हिंदूंच्या पतनास प्रतिबंध निर्माण झाला.

**३.धार्मिक:**

अ. हिंदू धर्मात सुधारणा घडून आल्या.
ब. हिंदू -मुस्लिम वैर कमी झाले .
क. तत्त्वज्ञान लोकविमुख झाले.
ड. अनेक पंथाचा उदय झाला.
इ. हिंदूंचे मोक्षाकडे लक्ष केंद्रित झाले.
ई. हिंदू धर्मातील विविध अप्रिय रूढी ,परंपरा बंद झाल्या .
उ. हिंदूंचे इस्लाम धर्म स्वीकारणे कमी झाले.

**४.आर्थिक परिणाम:** धार्मिक खर्च कमी झाला.

**५.सांस्कृतिक परिणाम:** लोकभाषा व वाड्:मय यांचा विकास झाला. बहुजनात विद्या प्रसार झाला[६].

भारतातील भक्ती चळवळीचे परिणाम युरोपातील ख्रिश्चन धर्माच्या प्रोटेस्टट सुधारणा चळवळी सारखे होते.

**समारोप:**

भक्ती चळवळीने भारतीय समाज आणि संस्कृती लक्षणे बदल घडवून आणले. जातीय व्यवस्थेला आव्हान देऊन आणि लोकांना पुरोहित,यांची गरज न पडता थेट देवासी जोडण्याची प्रोत्साहित करून सामाजिक समता वाढविली. या चळवळीने विविध गटांमध्ये, समुदायाची भावना निर्माण केली.जात,लिंग,धर्म याचे अडथळे दूर केले.साहित्य,उपासना या स्थानिक भाषेचा वापर वाढविला त्यामुळे अध्यात्मिक शिकवण सर्वत्र निर्माण झाली. आज भक्ती चळवळीचा वारसा लोकांना प्रभावित करत आहे. वेगवेगळी संस्कृतीमध्ये प्रेम, भक्ती, मानवता, एकता,समता मूल्यांना प्रोत्साहन देत आहे. भक्ती चळवळीचा वारसा सहिष्णुता आणि परस्परांचा आदरा आहे तो आजही अंतर धर्मीयांना प्रेरणा देत आहे.

**संदर्भ सूची:**

१. गायकवाड,सरदेसाई,थोरात,हनमाने**'मराठेकालीन संस्था व विचार'**फडके प्रकाशन,कोल्हापूर,१९८७ पृष्ठ -९१
२. पवार जयसिंगराव,पवार मंजुस्री **'भारताचा प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहास'**अरुंधती प्रकाशन,कोल्हापूर,२००६,पृष्ठ-२७३,२७४

३. जोशी लक्ष्मनशास्त्री (संपादक) **'मराठी विश्वकोश'खंड**-१२,महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्माती मंडळ,मुंबई,१९८५,पृष्ठ-०७

४. कुलकर्णी अ.रा.,खरे ग.ह.(संपादक)**'मराठ्यांचा इतिहास'**खंड पहिला,कॉन्तीनेन्टल प्रकाशन,पुणे २०१०, पृष्ठ-७१

५. जोशी महादेवशास्त्री(संपादक)**'भारतीय संस्कृती कोश'**खंड-सहा,भारतीय संस्कृती कोश मंडळ,पुणे ,१९७०,पृष्ठ -३५८

६. देशमुख.मा.म.**'मध्ययुगीन भारताचा इतिहास'**विश्वभारती प्रकाशन,नागपूर,१९९८,पृष्ठ -१८६